जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलताना ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे. यावेळी डावीकडून डॉ. अवनीश पाटील, रविराज देसाई, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# महाराष्ट्र घडविणारी माणसं समजावून घ्या

## मधुकर भावे : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. ११ : 'माणसांच्या कष्टाचे मोल जाणणारी माणसे म्हणजे यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील ही सारी नेतेमंडळी होती. त्यामुळे सर्वसामान्यांच्या उत्थानासाठीच त्यांनी अवघी हयात वेचली. त्यांच्या या कष्टातूनच आजचा महाराष्ट्र साकारला आहे. महाराष्ट्राला घडविणारी माणसं समजावून घेण्यास विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे', असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे 'लोकनेते बाळासाहेब देसाई आणि त्यावेळचा महाराष्ट्र' या विषयावरील त्यांचे विशेष व्याख्यान झाले. राजर्षी शाहू सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर पाटणच्या मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ व्हावे, असे स्वप्न राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण बाळगून होते. बाळासाहेब देसाई हे त्यांचे विद्यार्थी. म्हणजे गुरूने पाहिलेले स्वप्न विद्यार्थ्याने तडीस नेल्याचे हे एक दुर्मिळ पण महत्त्वाचे उदाहरण आहे. आजच्या पिढीपर्यंत त्यांचे कष्ट आणि द्रष्टेपण पोहोचणे आवश्यक आहे.'

व्याख्यानास डॉ. अरुण भोसले, व्ही. एस. पानस्कर, ईस्माईल पठाण, रणधीर शिंदे, दशरथ पारेकर, भारती पाटील, प्रकाश गायकवाड उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. दत्ता मचाले यांनी आभार मानले.

**विद्यापीठ कोल्हापूरला स्थापन करण्याचा निर्णय**

'यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई यांना बी.ए.ची पदवी घेण्यासाठी साठ रुपये खर्च करून मुंबईला जावे लागले होते. तेव्हा कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ व्हायलाच हवे, याविषयी देसाई यांचा मनोदय पक्का झाला. यशवंतरावांना विद्यापीठ कराडला व्हावे, असे वाटे, तर वसंतदादांना ते सांगलीला व्हावे, असे वाटे. तथापि, साताराचे असूनही बाळासाहेब मात्र विद्यापीठ कोल्हापूरलाच व्हावे, यासाठी आग्रही होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर विद्यापीठाचा हा विषय चर्चेसाठी येणार असल्याचे समजले, तेव्हा बाळासाहेबांच्या अंगात प्रचंड ताप होता. तरीही ते बैठकीला उपस्थित राहिले. यशवंतरावांनी त्यांना कोल्हापूरबद्दल आश्वस्त केले आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला स्थापन करण्याचा निर्णय झाला असल्याचे भावे यांनी सांगितले.

12 MAR 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराष्ट्र घडविणारी माणसे समजून घ्या

## मधुकर भावे; विद्यापीठात विशेष व्याख्यान

कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र आणि महाराष्ट्राला घडविणारी माणसे समजून घेण्यास विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत 'लोकनेते बाळासाहेब देसाई आणि त्यावेळचा महाराष्ट्र' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. पाटणच्या मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराजे देसाई प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानामध्ये बोलताना ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे. सोबत डॉ. अवनिश पाटील, रविराजे देसाई व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

भावे म्हणाले, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील या नेतेमंडळींच्या कष्टातून आजचा महाराष्ट्र साकारला आहे. महाराष्ट्रालाच नव्हे, तर संपूर्ण देशालाच दिशा देणाऱ्या अनेक योजना बाळासाहेबांच्या कारकिर्दीत साकार झाल्या. कसेल त्याची जमीन, विरोधी पक्षनेत्याला मंत्रिपदाचा दर्जा, एसटी महामंडळाच्या सेवेचा विस्तार, मराठी नाटकांवरील कर रद्द करण्याचा निर्णय देसाई यांनी घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये बाळासाहेब देसाई यांनी कळीची भूमिका बजावली.

कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ व्हावे, असे राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांनी पाहिलेले स्वप्न त्यांचे विद्यार्थी बाळासाहेब देसाई यांनी तडीस नेल्याचे दुर्मीळ उदाहरण आहे. आजच्या पिढीपर्यंत त्यांचे कष्ट आणि




द्रष्टेपण पोहोचणे आवश्यक आहे. सत्ता व पदाचा सदुपयोग जनतेच्या हितासाठी करण्याचा व कर्मभूमीप्रती कृतज्ञभाव बाळगण्याचा गुणधर्म बाळासाहेबांकडून शिकता येतो.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्ता मचाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अरुण भोसले, व्ही. एस. पानस्कर, डॉ. इस्माईल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, दशरथ पारेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

12 MAR 2024

जनसंपर्क कक्ष

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य घडविणारी माणसं समजावून घ्या

## मधुकर भावे : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्रविषयी व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र आणि महाराष्ट्राला घडविणारी माणसं समजावून घेण्यास विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत 'लोकनेते बाळासाहेब देसाई आणि त्यावेळचा महाराष्ट्र' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. पाटणच्या मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराजे देसाई प्रमुख उपस्थित होते.

### कोल्हापूरसाठी बाळासाहेब आग्रही

यशवंतरावांना विद्यापीठ कराडला व्हावे, असे वाटे, तर वसंतदादांना ते सांगलीला व्हावे, असे वाटे. तथापि, साताराचे असूनही बाळासाहेब मात्र विद्यापीठ कोल्हापूरलाच व्हावे, यासाठी आग्रही होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा विद्यापीठाचा विषय चर्चेसाठी येणार असल्याचे समजले, तेव्हा बाळासाहेबांच्या अंगात प्रचंड ताप होता. तरीही ते बैठकीला उपस्थित राहिले. यशवंतरावांनी त्यांना कोल्हापूरबद्दल आश्वस्त केले आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला स्थापन करण्याचा निर्णय झाला, अशी आठवण भावे यांनी सांगितली.



मधुकर भावे म्हणाले, साध्या माणसांच्या प्रामाणिकपणावर हे जग चालले आहे. त्या माणसांच्या कष्टाचे मोल जाणणारी माणसे म्हणजे यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील ही सारी नेतेमंडळी होती. त्यामुळे सर्वसामान्यांच्या उत्थानासाठीच त्यांनी अवघी हयात वेचली. त्यांच्या या कष्टातूनच आजचा महाराष्ट्र साकारला.

भावे म्हणाले, महाराष्ट्रालाच नव्हे, तर संपूर्ण देशालाच दिशा देणाऱ्या अनेक योजना बाळासाहेबांच्या कारकिर्दीत साकार झाल्या. गृहमंत्री पदाच्या कारकिर्दीत मुंबईमध्ये गेट वे ऑफ इंडिया आणि शिवाजी पार्क या दोन्ही ठिकाणचे छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे त्यांनी उभारले. शिक्षण मंत्रिपदाच्या कारकिर्दीत अल्प-मिळकत गटातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्कात सवलतीची योजना त्यांनीच सुरू केली. कृषिमंत्री म्हणून शेतामधील झाडे ही शेतकऱ्याच्या मालकीची करून देण्याचा निर्णय घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्येही बाळासाहेब देसाई यांनी अतिशय कळीची भूमिका बजावल्याचे भावे यांनी सांगितले. डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्ता मचाले यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. अरुण भोसले, व्ही.एस. पानस्कर, डॉ. ईस्माइल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, दशरथ पारेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024
लोकमत

# विद्यापीठात उद्यापासून अनुभवा कीटकांच्या जाती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने उद्या, बुधवारपासून कीटक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. प्राणिशास्त्र अधिविभागात होणाऱ्या या प्रदर्शनात सुमारे २२०० रंगीबेरंगी कीटकांचे दालन असेल. यामध्ये काटीकिडे, टोळ, नाकतोंडे, भुगे, मधिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक यांचा समावेश असणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होईल. शुक्रवार (दि. १५) पर्यंत प्रदर्शन सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ पर्यंत सुरू राहील, अशी माहिती डॉ. प्रा. एस. एम. गायकवाड, डॉ. प्रा. ए. ए. देशमुख यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024
पुढारी

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन, व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागातर्फे भारताचे दिवंगत उपपंतप्रधान व सयुंक्त महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. १२ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन मानव्यशास्त्र इमारतीमध्ये आयोजित केले आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त 'महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण' या विषयावर मानव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. अंबादास मोहिते, अमरावती यांचे व्याख्यान होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यशवंतराव चव्हाण अध्यासनाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024
सकाळ

# यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागातर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (ता.१२) चव्हाण यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे. 'महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण' या विषयावर प्रा. डॉ. अंबादास मोहिते (अमरावती) यांचे व्याख्यान आयोजित केले असल्याची माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024

पुढारी

# महिला दिनानिमित्त आयोजित तंत्रज्ञान अधिविभागातील स्पर्धांना प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे उद्घाटन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी इन्स्पायर इनक्यूजन, रोल ऑफ वूमेन इन लीडरशिप व आंत्रप्रनरशिप, रोल ऑफ वूमेन इन नेचर कॉन्झर्व्हेशन, रोल ऑफ वूमेन इन रोड सेफ्टी, रोल ऑफ वूमेन इन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, रोल ऑफ वूमेन इन रिसर्च अँड इनोव्हेशन विषय होते.

महिलांसमोरील आव्हाने, सामाजिक परिस्थिती, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग, उच्च पदांवर स्थान, संशोधनातील योगदान या विषयांवर विचारमंथन झाले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पुनश्री फडणीस, सहायक प्रा. शीतल देहानकर यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. वैशाली सावंत, सहयोगी प्राध्यापक यांनी केले. यावेळी डॉ. पी. डी. पाटील, डॉ. व्ही. एस. पाटील, एच. ए. पंडित, टी. आर. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024
सकाळ

# डॉ. धनंजय सुतार यांना एक्सलंट लायब्ररियन पुरस्कार



डॉ. धनंजय सुतार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक आणि उपग्रंथपाल डॉ. धनंजय सुतार यांना महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागातील ग्रंथालय व्यवसायामध्ये केलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल मुकला एक्सलंट लायब्ररियन अ‍ॅवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. मुंबई विद्यापीठ येथे सहा आणि सात मार्च रोजी आयोजित महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँड कॉलेज लायब्ररीयन्सअसोसिएशनतर्फे (मुकला) आयोजित सातव्या राष्ट्रीय परिषदेमध्ये हा पुरस्कार डॉ. सुतार यांना डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ही परिषद मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी वुमेन्स युनिव्हर्सिटी, इंडियन लायब्ररी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आली. यावेळी 'मुकला'चे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे, सचिव डॉ. विनय पाटील, समन्वयक डॉ. नंदकिशोर मोटेवार, सुभाष चव्हाण, एन. बी. दहिभाते उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2024
लोकमत

# डॉ. उत्तम सकट यांना अण्णाभाऊ साठे पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांना सन २०२२-२३ साठी महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार जाहीर झाला. आज, मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथे पुरस्कार प्रदान केला जाईल.

डॉ. सकट हे १९९७ पासून शिवाजी विद्यापीठात कार्यरत आहेत. सामाजिक न्याय विभागाच्यावतीने समाजकल्याण क्षेत्रामध्ये बजावलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. सकट यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. डॉ. सकट हे मागासवर्गीय, उपेक्षित, वंचित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्थानासाठी सातत्याने कार्यरत आहेत.

मातंग समाजामध्ये सामाजिक व शैक्षणिक जागृतीसाठीही ते काम करीत आहेत. त्यांनी 'अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि मातंग समाज' या विषयावरील शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठास सादर केला. याचे पुस्तक रूपात प्रकाशनही करण्यात आले आहे.